विद्यापीठ अनुदान आयोग अंतर्गत
लघुशोध प्रबंधाचा सारांश
SUMMARY OF MINOR RESEARCH PROJECT

# आचार्य विनोबा भावे - भुदान चळवळ

## एक ऐतिहासिक मुल्यमापन

(१९५१-१९६९)

- संशोधनकर्ता -
**डॉ. विरेंद्र गोपालसिंह बैस**
सहयोगी प्राध्यापक (इतिहास विभाग)
यशवंत विद्यालय, वर्धा

२०१७

# आचार्य विनोबा भावे - भूदान चळवळ -
# एक ऐतिहासिक मुल्यमापन
# (१९५१ – १९६९)

म. गांधी दक्षिण आफ्रिकेत सेवाकार्य करीत होते त्यावेळी वर्ध्याचे सेठ जमनालाल बजाज महात्मा गांधीकडे आकर्षित झाले होते. म. गांधी भारतात १९१५ ला परत आल्यावर जमनालाल यांनी म. गांधीची अहमदाबाद येथे भेट घेतली त्यावेळी म. गांधी अहमदाबाद येथील कोचरब मोहल्यात मुक्कामी होते. तेव्हापासून म. गांधी आणि जमनालाल बजाज यांचे जवळीक संबंध निर्माण झाले. अशा वेळी जमनालालजीनी म. गांधीना वर्धा येथे कायमच्या मुक्कामी यावे अशी विनंती केली. परंतु मला गुजराथ मध्ये राहून देश सेवा करावी असे वाटते असे महात्मा गांधीनी उत्तर देताच लगेच जमनालाल यांनी मला आपला पाचवा पूत्र मानावा असा प्रश्न करताच गांधीजींना यावर होकार दर्शविताच जमनालजी म. गांधीचे पाचवे पूत्र झाले.

म. गांधीनी वर्धा येथे येण्यास नकार दर्शविला मात्र आपल्या साबरमती आश्रमातून विनोबा भावे, मगनलाल गांधी, रघुनाथ धोत्रे, द्वारकानाथ हरकरे, कृष्णदास गांधी, शिवाजी भावे यांना वर्धेला पाठविले. विनोबा भावे यांनी सत्याग्रहाश्रमाची स्थापना ग्रामोद्योग जवळ १९२१ ला गुडीपाडव्याच्या दिवसी स्थापना केले. विनोबा भावे यांनी रचनात्मक कार्याबरोबर १९२३ च्या झेंडा सत्याग्रह, कायदेभंग, व्यक्तिगत चळवळ आणि भारत छोडो आंदोलनात सहभागी होऊन तुरुगंवास पत्करला होता. विनोबाजीने काही दिवस नालवाडी येथे मुक्काम करुन तेथे ग्रामोद्योग व्यवसाय सुरु केला. त्यानंतर विनोबांना पवनार येथे धामनदीच्या तिरावर जमनालाल बजाज यांच्या बंगल्यात जाऊन राहावे लागले. विनोबानी पवनारला परमधाम आश्रमाची स्थापना केली.

विनोबानी पवनार येथील परमधाम आश्रमातून व्यक्तिगत चळवळ सुरु केली. म. गांधीनी त्यांची पहिला सत्याग्रही म्हणून नियूक्ती केली होती. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी राजकारणाएवजी समाजकारण हे कार्यक्षेत्र निवडले. विनोबा भावे यांच्यावर गांधीजीच्या तत्वज्ञान व विचाराचा जबरदस्त पगडा होता. समाजात समानता निर्माण व्हावी या दृष्टीने त्यांनी सर्वोदय कार्यक्रम हाती घेतला. सर्वोदय कार्यक्रमातून भूमी समस्येवर उपाय म्हणून त्यांनी भूदान चळवळ उभारली. तेलंगणातील पोचमपल्ली येथून भूदान चळवळीला त्यांनी प्रारंभ केला. पुढे देशव्यापी भूदान चळवळीत रुपांतर झाले.

विषयानिवडीची उद्दिष्टे :-

राष्टपिता महात्मा गांधी यांच्या सर्वोदय विचारसरणीतून आचार्य विनोबा भावे यांनी उभारलेल्या भूदान चळवळीचा प्रारंभ तेलगंणातील पोचमपल्ली गावापासून झाला व ही चळवळ अल्पावधीतच संपूर्ण भारतात विस्तारित झाली. परंतु कालांतराने ही चळवळ अस्तंगत होऊन इतिहास जमा झाली. या चळवळीचा अभ्यासकरण्याकरिता पुढील उद्देश समोर ठेवण्यात आलेले आहे.

१) आचार्य विनोबा भावे यांच्या सर्वोदय विषयक विचारांचा अभ्यास करणे.
२) भूदान चळवळीच्या संबंधात आचार्य विनोबा भावेंची भूमिका स्पष्ट करणे.
३) भूदान चळवळीचा तत्कालीन भारतातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीशी सांगड घालून अभ्यास करणे.
४) भूदान चळवळ ही साम्यवादी कारवायांना शह देण्याकरीता एक अहिंसक व शांततावादी मार्ग होता का ? हे अभ्यासने.
५) भूदान चळवळीचा महात्मा गांधीच्या सत्याग्रह प्रयोगाशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करणे.
६) भारताच्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या दृष्टीने चळवळीचे असलेले महत्त्व स्पष्ट करणे.
७) भूदान चळवळीच्या यश व अपयशाचे मूल्यमापन करणे.

**संशोधनाचे उद्दिष्टे :-**

प्रस्तुत शोध कार्य खालील उद्दिष्टे महत्त्वपूर्ण ठरु शकते.

१) समाजसुधारक, सामाजिक कार्यकर्ते आणि शासनाच्या विविध सामाजिक योजनांची आखणी व अमलबजावणी करण्याच्या दृष्टिने उपयोगी ठरेल.
२) महाविद्यालयीन विद्यार्थी व अभ्यासकांना प्रस्तुत शोधकार्य मार्गदर्शक ठरेल.
३) शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या जनकल्याणकारी योजनांना प्रस्तुत शोध कार्यामुळे नवीन दिशा मिळेल.
४) सर्वोदय हि विचारधारा प्रत्यक्ष रामराज्य किंवा आदर्श कल्याणकारी राज्य स्थापना करण्याच्या दृष्टिने परिणामकारक असून या चळवळीला नवसंजीवनी प्राप्त करुन देण्याच्या दृष्टिने सामाजिक आणि राजकिय पुढाऱ्यांना प्रस्तुत शोधकार्याचा फायदा होईल.
५) या चळवळीच्या विभिन्न पैलूंवर अध्ययन करणाऱ्या अभ्यासकांना प्रस्तुत शोध कार्य उपयोगी ठरेल.

विषय निवडीची कारणमिमांसा :-

आजपर्यंत भूदान चळवळीवर अर्थशास्त्रीय व समाजशास्त्रीय दृष्टीने संशोधन कार्य झालेले आहे. परंतु ऐतिहासिक अभ्यासाच्या दृष्टिने भूदान चळवळीवर संशोधन कार्य झालेले नाही. भूदान चळवळीचे

ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन या चळवळीच्या विविध पैलुंवर प्रकाश टाकण्याचे संशोधन कर्त्याचे उद्देश आहे. सामाजिक व आर्थिक दृष्टीकोणातून इतिहासाची मांडणी करण्याचा उपक्रम आज सर्वत्र केला जातो तेव्हा या नव्या दृष्टीकोणातून भूदान चळवळीचा अभ्यास नव्याने होण्याची गरज आहे. कारण या चळवळीने आपला प्रभाव तत्कालीन समाज व अर्थव्यवहारांवर घातलेला आहे. या कारणास्तव प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

**संशोधन कार्यप्रणाली :-**

प्रस्तुत शोधकार्याची कार्यप्रणाली पुढील प्रमाणे राहील. शोधकार्याचा आराखडा तयार करणे व संशोधन विषयासाठी लागणाऱ्या ऐतिहासिक साधनांच्या पूर्तीसाठी ग्रंथालयाचा व अभिलेखागारांचा वापर करणे. तसेच या शोधकार्याकरिता आचार्य विनोबाजींनी लिहीलेले मुळ साहित्य तसेच इतर लेखकांनी लिहीलेल्या भूदानविषयक साहित्य व लेख यांचा अभ्यास करण्यात येईल व मुळ साहित्यांचा प्रस्तुत शोध कार्याकरिता पूरेपूर वापर करण्यात येईल. तसेच भूदान चळवळीत आचार्य विनोबा भावे सोबत सक्रिय सहभाग घेतलेल्या व हयात असलेल्या कार्यकर्त्यांना भेटून त्यांच्या मुलाखतीवर लक्ष केंद्रित करण्यात येईल. तसेच सर्वोदय आश्रम व विनोबा विचार केन्द्र, नागपूर येथील सहित्य व चरित्रग्रंथे, सर्व सेवा संघ गोपूरी वर्धा, परंधाम आश्रम पवनार येथील साहित्य, दिल्ली येथील नेहरु मेमोरियल लायब्ररीतील भूदान विषयक साहित्य. तसेच भूदान चळवळीची संबंधीत तत्कालीन सरकारी कागदपत्रे व वर्धा आणि सेवाग्राम येथील ग्रंथालयात मिळणारी ग्रंथे व साहित्य इत्यादी. मूळ व दुय्यम साधनाच्या आधारे तसेच प्रकाशित अप्रकाशित साधनांचा उपयोग करुन संशोधन करण्यात येईल.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधन कार्याकरिता योग्य संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. ही संशोधन पद्धती शास्त्रीय व ऐतिहासिक अशीच राहील. ऐतिहासिक संशोधन पद्धती प्रमाणे संशोधन कार्य करण्यात येईल.

तसेच सामाजिक संशोधन पद्धतीप्रमाणे संबंधीत ग्रंथालयाला भेटी देऊन जमविलेल्या कागदपत्रांचे संकलन केले जाईल. उपलब्ध परिक्षण करण्यासाठी बहिरंग परिक्षण व अंतरंग परिक्षण पद्धतीचा वापर केला जाईल व त्यानंतर निवडलेल्या कागदपत्रांचा तसेच उपलब्ध करुन घेतलेल्या माहितीचा अन्वयार्थ लावून पद्धतीशास्त्रातील शिस्तीप्रमाणे या कागदपत्रांची मांडणी संशोधन पद्धती प्रमाणे केली जाईल. याशिवाय विनोबांच्या सोबत राहिलेल्या, कार्यातील सहभाग असलेल्या लोकांकडून मुखाखत पद्धतीने माहिती मिळविण्याचाही प्रयत्न केला जाईल.

प्रकरण रचना :-

प्रस्तुत लघुसंशोधन कार्य खालीलप्रकरणात विभाजीत केलेले आहे.

१) **प्रकरण पहिले :- प्रास्ताविक**

२) **प्रकरण दुसरे :- विनोबांचे आश्रम - पवनारची ऐतिहासिक पार्श्वभूमी**.

पवनार हे वर्धा नदीच्या दोन्ही बाजूला बसलेले पुरातन गांव वर्ध्याच्या ईशान्येस ९ कि.मी. वर असुन त्यास समृध्द ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. पवनार म्हणजेच वाकाटक राजा दुसऱ्या प्रवरसेनची राजधानी प्रवरपूर असा सिध्दांत पुरातत्वज्ञांनी अलिकडे मांडलेला आहे. पूर्वी रूढ असलेल्या समजूतीप्रमाणे पवन नामक राजपूत राजाच्या नावावरून पवनार हे नांव पडले. पवन राजाची या परिसरात अधिसत्ता असावी. या राजाबद्दलच्या आणि त्याने केलेल्या चमत्काराबद्दल अनेक दंतकथा आहेत. आईना-ए-अकबरीमध्ये पवनारचा पनार असा उल्लेख केलेला असुन १६०१ मधील वऱ्हाड सुभ्यातील १६ सरकारांमध्ये (उपविभाग) पनार सरकार समाविष्ट असल्याचे म्हटले आहे. पनार सरकारचे मुख्यालय याच गावी असल्याचेही अबूल फजलने नमुद केले आहे.

पवनार उत्खननातील संशोधनानुसार प्रवरपूरची प्राचीनता इ.स. पूर्व १००० पर्यंत जाते. धाम नदीच्या परिसरातील दाट जंगले तोडुन मानव वसाहत केली असावी. येथील लोकांचे घरे मौर्य, सातवाहनकालीन घराप्रमाणे होती. रोमन साम्राज्याशी पवनारचे संबंध असावेत. तेथे सापडलेल्या काही अवशेषानुसार असे म्हणता येईल की वाकाटक काळात येथे समृध्दी होती.

पवनारचा प्राचीन संस्कृतीक वारसा समृध्द खरा, परंतू संपूर्ण भारतीय जनतेचे आणि विशेषत: गांधीवादी जनतेचे श्रध्दास्थान बनले, पवनारचा परंधाम आश्रम आचार्य विनोबांनी १९३८ मध्ये स्थापन केलेला हा आश्रमही भारतातील एक आदर्श संस्था होय. पवनारला येण्यापूर्वी विनोबाजींचे १९३२ पासून नालवाडीत वास्तव्य होते. १९३८ मध्ये जमनालालजींच्या पवनार येथील लाल बंगल्यात व्यापक पायावर आश्रम उभारला. याच आश्रमातून १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेण्यासाठी विनोबांनी प्रमाण केले होते. भारत छोडो आंदोलनात विनोबा व इतर आश्रमवासियांना अटक झाली. तथापि आश्रमाचे काम अंशत: चालुच होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आश्रम पुन्हा उर्जितावस्थेत आला. तेथूनच विनोबांनी भूदान व ग्रामदानाची भारतीयांना प्रेरणा दिली. महिलांनी ब्रम्हविद्या मंदिरात आध्यात्मिक साधना केली. या संस्थेच्या

कार्याचे मूल्यमापन करण्याचे येथे प्रयोजन नाही. इतके मात्र म्हटले पाहिजे की, संस्थेची ख्याती देशभर पसरली. पूज्य विनोबांच्या वास्तव्याने पुनित झालेल्या व त्यांच्या कार्याचे दर्शन घडविणाऱ्या परंधाम आश्रमाकडे हजारो देशी व विदेशी पर्यटक आकृष्ट होतात. हजारोंचे हे श्रध्दास्थान आहे तर लाखोंनी त्यातून प्रेरणा घेतली आहे. परंधाम हे प्रेक्षणीय स्थळ नसून प्रेरणास्थळ आहे तर लाखोंनी त्यातुन प्रेरणा घेतली आहे. परंधाम हे प्रेक्षणीय स्थळ नसून प्रेरणास्थळ आहे. साधनास्थळ आहे. आश्रमातील निवाऱ्याचे वर्णन वास्तूशिल्पाच्या दृष्टिकोणातून करता येणार नाही. कारण तेथील शिल्प वास्तूचे नसुन प्रेरणेचे आहे, साधनेचे आहे. अशा या पवनारच्या प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळातील इतिहासावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या प्रकरणातुन करण्यात आला आहे.

३) **प्रकरण तिसरे :- महात्मा गांधी आणि विनोबा भावे संबंधात.**

विनोबा यांचा गृहत्यागाचा विचार पक्का झाल्यानंतर त्यांनी हिमालयाकडे किंवा बंगालमध्ये जाण्याचा विचार मनात बांधला. हिमालयात जाण्यामागे ज्ञानयोग प्राप्त करणे, तसेच बंगालमध्ये जाण्यामागे त्यांना वंदे मात्‌रम क्रांतीची भावना ओढत होती. या कारणास्तव त्यांनी बंगालकडे रेल्वेने जाण्यास निघाले. परंतु काशी या ठिकाणी त्यांनी उतरून तेथे ६ फरवरी, १९१६ रोजी महात्मा गांधींचे भाषण ऐकले. महात्मा गांधीकडे ते आकर्षित झाले. लगेच त्यांनी महात्मा गांधींशी पत्र व्यवहार सुरू केला. त्यात त्यांनी अहिंसेविषयी आपल्या मनात असणारी जिज्ञासा विचारली. त्यावर महात्मा गांधींनी त्यांना आपल्याकडे बोलावून घेतले. याविषयी ७ जुन, १९१६ रोजी विनोबा लिहितात मी हिमालयात गेलो नाही किंवा बंगालात पोहोचलो नाही. मी गांधीजवळ पोहोचलो आणि त्यांच्याजवळ मला हिमालयाची शांती आणि बंगालची क्रांती मिळाली. म्हणजे क्रांती व शांती या दोन्हीचा अपूर्व संगम झाल्यामुळे मी गांधीजींच्या आश्रयाखाली गेलो.

साबरमती येथे वास्तव्य असतांना विनोबांचे कोचरब आश्रमात आगमन झाले. जमनालाल बजाज यांचा महात्मा गांधींना वर्धा येथे यावे अशाप्रकारचा आग्रह असतांना त्यांनी स्वत: न येता विनोबा भावे आणि त्यांच्या समवेत ७ ते ८ लोकांना साबरमती आश्रमातून वर्धेला पाठविले. विनोबाजी महात्मा गांधींच्या सुचनेवरून वर्धेला आले आणि सत्याग्रह आश्रमची स्थापना जमनालाल बजाज यांच्याबगिच्याजवळ केली. तेथुन जमनालाल बजाज यांचा बंगला असलेल्या त्या घरात विठोबांचे वास्तव्य सुरू झाले. त्याला घास बंगला असे म्हणतात. या घास बंगल्यात सत्याग्रहीचे आगमन मोठया प्रमाणात सुरू झाल्यामुळे विनोबांचे वास्तव्य नविन जागेत गेले.

मारवाडी विद्यालयाच्या वसतीगृहाच्या पलिकडे मोकळया शेतात विनोबांनी नविन आश्रमाला सुरूवात केली, येथे विणकाम आणि रचनात्मक कार्याला प्रारंभ केला.

महात्मा गांधी १९३४ मध्ये जेव्हा वर्धेला कायमच्या वास्तव्यासाठी आले आणि १९३६ मध्ये ते सेवाग्रामला स्थाईक झाले. या काळात विनोबाजी यांचा गांधीजी सोबत सतत भेट आणि पत्र व्यवहार अस्तित्वात होता. गांधीजींच्या सुचनेवरून विनोबांनी नालवाडीला आपला आश्रम बसविला. येथेही विणकाम आणि रचनात्मक कार्यास प्रारंभ केला. पुढे त्यांची प्रकृती अस्वस्थ झाल्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्यावरून मोकळया जागेत जावुन राहण्याचा सल्ला देण्यांत आला. पवनार जवळील धाम नदीच्या पलिकडे उंचवट जागेवर जमनालाल बजाज यांचा बंगला होता. तेथे विनोबाजी कायमचे वास्तव्यासाठी गेले. येथे विनोबांनी परमधाम आश्रमाची स्थापना केली. याच आश्रमातून पुढे विनोबांनी कायदेभंग चळवळ, भारत छोडो चळवळ आणि व्यक्तिगत चळवळीचे नेतृत्व केले. महात्मा गांधी यांच्या मृत्युनंतर त्याच आश्रमातून त्यांनी महात्मा गांधी यांच्या सर्व रचनात्मक कार्याचे संघटन करून सर्वसेवा संघाची स्थापना केली आणि भुदान चळवळ ही मोठया प्रमाणात राबविली.

४) **प्रकरण चौथे :- आचार्य विनोबा भावे यांचे पवनारला आगमन आणि रचनात्मक कार्ये**

१९३३ च्या सप्टेंबर महिन्यात २६ तारखेला महात्मा गांधी कायमच्या वास्तव्यासाठी वर्धा येथे आले. सेवाग्रामच्या आश्रमात जाईपर्यंत सुमारे ३ वर्षे सत्याग्रह आश्रमातच ते राहत असत. गांधीजींचा सहवास विनोबांना नेहमीच प्रियकर आणि प्रेरक वाटत असे. याच दरम्यान विनोबांचे एक शिष्य मनोहर दिवाण यांनी विनोबांपासुन प्रेरणा घेऊन कुष्ठसेवेचे काम वर्ध्याजवळ दत्तपूर येथे सुरू केले. नालवाडी येथे चर्मालय सुरू करण्यांत आले. याच काळात बापूजींच्या मागणीनुसार विनोबांनी गीतेच्या अध्यायाची संगती लावणारे लेखनही केले. विषयवार अशी अध्यायाची मांडणी करून केलेली 'गीता अध्याय संगती' गांधीजींना फार आवडली. विनोबांचा कुराण ग्रंथाचा अभ्यासही याच वेळी पार पडला. खानदेशातील फैजपूर येथील १९३६ च्या काँग्रेसच्या अखिल भारतीय अधिवेशनाच्या आयोजनाचा आणि व्यवस्थेच्या जबाबदारीचा मोठा वाटा विनोबांनी उचलला होता.

काही दिवसांनी एकाएकी विनोबांची प्रकृती ढासळू लागली. वजन आणि आहार कमी झाला. विलक्षण असा शारिरीक थकवा जाणवू लागला. धूळ, गोंगाट आणि वर्दळ यांचा त्रास असहय वाटू लागला. स्वत: विनोबा या गोष्टीकडे लक्ष दयायला तयार नव्हते. जमनालालजी आणि गांधीजी यांनी त्यांचे मन वळविले. शेवटी मोकळया हवेतच उंच ठिकाणी राहण्याचे कबुल

करून विनोबा पवनारच्या लाल बंगल्यात रहायला गेले. धामनदीच्या पलीकडे असलेल्या या जागेला त्यांनी 'परंधाम' असे नांव दिले. या परंधाम आश्रमातच विनोबांचे शेवटपर्यंत वास्तव्य होते. याच परंधाम आश्रमात त्यांच्या जीवनातील अनेक महत्वपूर्ण घटना घडल्या. म्हणून या प्रकरणाचा पहिल्या भागात कोणत्या परिस्थितीत विनोबाजींचे पवनारला आगमन झाले याचा आढावा घेण्यात आला आहे. जर विनोबांनी त्यावेळी जमनालालजींच्या लाल बंगल्याची निवड केली नसती तर विनोबांच्या सुप्त कार्यशक्तीचा विविधांगी अविष्कार पाहण्याचे भाग्य परंधाम आश्रमाच्या वाटयाला आले नसते असे म्हटल्यास चूक ठरणार नाही.

परंधाम आश्रमात १९४५ च्या जुलै महिन्यात विनोबांनी तीन पुस्तके लिहिली. ती म्हणजे 'गीताइ शब्दार्थ कोष', 'ज्ञानदेव चिंतनिका' व 'गीताई अधिकरण माला' त्यामुळे २० व्या शतकातील या संताचे गदय अभंग लोकांना वाचावयास मिळाले असे वि.स. खांडेकर म्हणतात.

परंधाम आश्रमात त्यांनी शेतीच्या क्षेत्रात दोन प्रयोग केले. त्यापैकी पहिला प्रयोग म्हणजे कांचनमुक्ती, या प्रयोगात पैशाऐवजी श्रमाची प्रतिष्ठा वाढावी हा हेतू होता. अन्न, वस्त्र, शिक्षण आणि आरोग्य याबाबतीत स्वावलंबी होण्याचा हा प्रयोग होता. पवनार येथे अठरा आश्रमवासी एकत्र आले. १४ एकर जमिनीतून जेवढे उत्पन्न निघेल त्यावरच आपली उपजिवीका ठेवावी असा निर्णय घेतला गेला. भारतात माणसी पाऊण एकर जमीन प्रत्येकला पुरेसी आहे असे या प्रयोगाद्वारे सिध्द केल्या गेले.

दुसरा प्रयोग होता ऋषी शेती, बैलाची वा जनावराची मदत न घेता शेती करण्याचा हा आगळा प्रयोग होता. कुदळीने जमीन खोदून सारी कामे मानवी श्रमाने केली जात होती. त्यात श्रमदान भरपूर करावे लागे. जयप्रकाश नारायण सुध्दा या प्रयोगाने भारावून गेले होते.

५) **प्रकरण पाचवे :- वर्धा जिल्हयातील भूदान चळवळीचे प्रथम पर्व (१९५१-१९५७)**

महात्मा गांधींच्या मृत्युनंतर दीड महिन्याने १३ मार्च, १९४८ ला सेवाग्राम येथे महात्मा गांधीच्या शिष्यांचा व भारतातील गाधीवाद्यांचा सर्वोदय समाज स्थापन झाला. दरवर्षी भारतातील विविध प्रदेशात सर्वोदय समाजाचे संमेलन, घेण्याचे विनोबांनी ठरविले. सर्वोदय समाजाने देशात गांधीजींनी सांगितलेल्या मार्गाचे अनुसरूण करून सर्वोदयाची स्थापना करण्याचे ध्ये ठरविले. यानुसार शिवरामपल्ली येथे सर्वोदय समाजाचे तिसरे संमेलन भरणार होते. या संमेलनाकरिता विनोबा पवनार वरून पदयात्रा करीत शिवरामपल्लीच्या संमेलनात गेले. तेथून

परत येत असतांना साम्यवादी चळवळींनी ग्रस्त असलेल्या तेलंगणाचा दौरा केला. त्यावेळेस नलगुंडा जिल्हयातील पोचमपल्ली या गावात १८ एप्रिल, १९५१ ला पोहचले व तेथे एक सभा घेवून गावातील भूमिहीनांची समस्या तेथील जमीनदारांसमोर मांडली. तेव्हा गावातील जमीनदार रामचंद्र रेड्डी यांनी १०० एकर जमिनीचे दान विनोबांना दिले. विनोबांनी ती जमीन भूमिहीनात वाटली. येथूनच भूदान चळवळीचा उगम झाला. त्यानंतर विनोबा भूदानाकरीता भारताच्या पदयात्रेवर निघाले. १९५७ पर्यंत विनोबांना हजारो एक भूमी भूदानात मिळाली. १९५७ साली ऐलवाल येथे भरलेल्या परिषदेत विनोबांनी भूदान चळवळीचे रूपांतर ग्रामदान चळवळीत करण्याची घोषणा केली. यामुळे १९५१ ते १९५७ हा भूदान चळवळीचा प्रथम टप्पा मानला जातो. १९५७ नंतरही भूदान चळवळ अस्तित्वात होती. परंतु विनोबांच्या ग्रामदानाच्या आग्रहामुळे ही काहीसी मंदावली होती. या पार्श्वभूमीवर वर्धा जिल्हयातील भूदान चळवळीचे सुध्दा दोन कालखंड पडतात.

प्रस्तुत प्रकरणात वर्धा जिल्हयातील भूदान चळवळीच्या प्रथम कालखंडाचे विवेचन करण्यांत आले आहे. विनोबाजी आंध्रप्रदेशातील ५१ दिवसाची भूदान यात्रा पूर्ण केल्यांनतर २७ जून, १९५१ ला परमधाम आश्रमात पोहोचले, येथे त्यांनी पुन्हा कांचनमुक्ती प्रयोग सुरू केला.

६) **प्रकरण सहावे :- वर्धा जिल्हयातील भूदान चळवळीचे द्वितीय पर्व (१९५८-१९६९)**

स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या सामाजिक व आर्थिक क्षेत्रात भूदान चळवळीने परिवर्तनाचे वारे वाहु लागले होते. या नवपरिवर्तनाचे नेर्तत्व विनोबाकडे होते. संपूर्ण भारतातील भूमिचे योग्य नियोजन करून ती भूमिहिनांमध्ये वाटप करून भारतात सामाजिक व आर्थिक क्रांती घडवून आणण्याच्या प्रयत्नात विनोबा होते. विनोबांच्या या क्रांतीला अहिंसेचा आधार होता. लोकांचे हृदयपरिवर्तन करून भूमि समस्येचा प्रभावी उपाय म्हणून विनोबांनी भूदान चळवळीला मान्यता दिली होती. या भूदान चळवळीमागे गांधी विचारांचे अधिष्ठान होते. त्यामुळे विनोबांच्या भूदान चळवळीला भारतात मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळत होता. समाजातील राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील लहान मोठे लोक या चळवळीत संमिलीत होवून चळवळीची व्यापकता वाढवित होते.

विनोबांनी भारतातील भूमी समस्या सोडविण्यासाठी एकूण लागवडीखालील जमीनींचा सहावा हिस्सा भूदानामध्ये मागीतला होता. त्याकरिता विनोबांनी १९५७ ही कालमर्यादा

निश्चित केली होती. १९५७ पर्यंत भारतातील ५ कोटी एकर जमीनीची मागणी विनोबांनी केली होती. परंतु या काळात विनोबांचे हे लक्ष पूर्ण होवू शकले नाही. याच दरम्याच वर्धा जिल्हयातील सर्वोदय कार्यकर्ते विनोबांची भूमिक्रांती वर्धा जिल्हयात यशस्वी करण्याच्या प्रयत्नात लागले होते. एकंदरीत याकरीता जय्यत तयारी झाली होती. अशातच सप्टेंबर १९५७ ला कर्नाटक येथील येलवाल येथे ग्रामदान परिषद भरविण्यांत आली. या परिषदेतून भूदानाला पर्याय म्हणून ग्रामदान चळवळ राबविण्यांत यावी, हा विचार पूढे आला.

येलवाल परिषदेनंतर वर्धा जिल्हयातील भूदान चळवळीला ओहोटी लागली. वर्धा जिल्हयात भूदानात अग्रेसर असलेले कार्यकर्ते या परिषदेच्या निर्णयानंतर विचलित झाले. त्यामुळे वर्धा जिल्हयात ग्रामदानाला योग्य प्रमाणात प्रतिसाद मिळू शकला नाही. १९५८–१९६९ ला वर्धा जिल्हयातील भूदान चळवळीच्या दुसऱ्या कालखंडात भूदानाला उतरती कळा लागली. तरीपण या काळात वर्धा जिल्हयात भूदान चळवळी मागील प्रेरणा मोठया प्रमाणात कार्यरत होती. महाराष्ट्रातील इतर जिल्हयाच्या तुलनेत या कालखंडात जिल्हयात प्रभावी भूदान होत होते. त्याचप्रमाणे या कालखंडात सर्वोदय कार्यकर्त्यांनी आपले लक्ष भूदानात प्राप्त झालेल्या जमिनीच्या वितरणाकडे केंद्रीत केले होते. या पार्श्वभूमीवर वर्धा जिल्हयातील १९५८–१९६९ या काळातील भूदान चळवळीच्या विकासाचे विवेचन प्रस्तुत प्रकरणात करण्यांत येत आहे.